किंचित बाण, भगव्याची शान

लोकसत्ता विशेष प्रतिनिधी

छत्रपती संभाजीनगर : शिवसेना-भाजप युतीमध्ये नेहमीच धाकट्या भावाची भूमिका बजावणाऱ्या भारतीय जनता पक्षाने युती तोडली आणि छत्रपती संभाजीनगर शहरात पहिल्यांदाच ५८ जागा मिळवत कमळ फुलवले. नितेश राणे यांची केवळ एक आक्रमक सभा वगळता भाजपने निवडून येणाऱ्यांना उमेदवाऱ्या दिल्या आणि परिवारासह प्रचारात कार्यकर्त्यांना उतरवल्याने 'थोडेसे खान, किंचितसा बाण आणि भगव्याची शान' असा आपल्या घोषवाक्यात बदल करून घेतला. एमआयएमने ३३ जागांवर विजय मिळवला आहे.

छत्रपती संभाजीनगरची निवडणूक 'खान आणि बाण' भोवती फिरते.

छत्रपती संभाजीनगर महापालिकेमध्ये एकहाती स्पष्ट बहुमत मिळवत सत्तेवर आलेल्या भाजपच्या नेत्यांनी कार्यकर्त्यांसमवेत विजयोत्सव साजरा केला. यावेळी मंत्री अतुल सावे, डॉ. भागवत कराड, किशोर शितोळे आदी.

यावर उत्तर देताना मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस म्हणाले होते, ''ना खान ना बाण आता फक्त भगव्याची शान.'' हे त्यांनी दिलेले घोषवाक्य मंत्री अतुल सावे, खासदार डॉ. भागवत कराड, महापालिका निवडणुकीचे प्रमुख समीर राजूरकर, किशोर शितोळे यांनी प्रत्यक्षात उतरवले. तब्बल ५७ जागांवर भारतीय जनता पक्षाला यश मिळाले. यात एक शिवसेना आटली, दुसरी घटली. मोठा भाऊ म्हणून मिरविणाऱ्या एकनाथ शिंदे यांच्या शिवसेनेची

पक्षीय बलाबल

- भाजप - ५८
- एमआयएम - ३३
- शिवसेना (शिंदे) - १२
- शिवसेना (ठाकरे) - ६
- वंचित बहुजन आघाडी - ०४
- काँग्रेस - ११
- राष्ट्रवादी काँग्रेस (श.प) - १

जबाबदारी मंत्री संजय शिरसाट व खासदार संदिपान भुमरे यांच्याकडे सोपविण्यात आली होती. मात्र, त्यांना ती यावेळी पेलवता आली नाही, असे निकालातील आकड्यांवरून स्पष्ट होत आहे. शिवसेनेच्या शिंदे गटाला केवळ १२ जागांवर समाधान मानावे लागले.

रशीद मामू यांच्या प्रवेशानंतर उद्धव ठाकरे यांना मुस्लिम धार्जीणे ठरविण्यात भाजपला यश आले. चंद्रकांत खैरे आणि अंबादास दानवे यांच्यातील अंतर्गत कलहामुळे ठाकरे गटाला केवळ सहा जागांवर समाधान मानावे लागले.

एमआयएमने मात्र, त्यांच्या पूर्वीच्या ताकदीत आणखी वाढ केल्याचे दिसून आले. पूर्वी एमआयएमला २६ जागा मिळाल्या होत्या. यावेळी २५ उमेदवार बदलूनही ३३ जागांवर त्यांनी विजय मिळवला आहे. ओवेसी बंधूंच्या सभांमुळे पतंगासाठी अनुकूल वारे तयार झाले. अंतर्गत मतभेद असतानाही एमआयएमला मोठा विजय मिळवता आला. छत्रपती संभाजीनगरमध्ये एमआयएम हा आता दुसऱ्या क्रमांकाचा पक्ष ठरला आहे.

वंचित बहुजन आघाडीला चार जागांवर यश मिळाले. काँग्रेसनेही एक जागा कशी-बशी राखली. राष्ट्रवादी काँग्रेसच्या शरदचंद्र पक्षाचे नवीनसिंग ओबेराय हे निवडून आले. भाजपला संपूर्ण शहरातून पाठिंबा मिळत असल्याचे चित्र दिसून आले.

अमित देशमुख यांनी चक्रव्यूह भेदले

लातूरमध्ये 'हात' भारी; भाजपचे सत्तास्वप्न भंगले

लोकसत्ता विशेष प्रतिनिधी

छत्रपती संभाजीनगर : दलित, मुस्लिम आणि लिंगायत मतांचा आधार घेत आखलेल्या रणनीतीला भाजपच्या चुकीच्या प्रचाराची अप्रत्यक्षपणे साथच मिळाली आणि अमित देशमुख यांनी लातूर महापालिकेत काँग्रेसचा झेंडा उंच राखता आला. दिवंगत विलासराव देशमुख यांच्या विरोधातील वक्तव्य लातूरकर सहन करत नाहीत, असा संदेशही लातूरकरांनी दिल्याचे मानले जात आहे. मराठवाड्यात काँग्रेस वर्चस्वाची ही एकमेव महापालिका आहे. एकूण ७० जागांपैकी काँग्रेस व वंचित बहुजन आघाडीने ४७ जागा जिंकल्या. लातूर महापालिकेत सत्ता स्थापन करण्याचा मार्ग मोकळा झाला असून, वंचित बहुजन आघाडीने पाच जागा पटकाविल्या. भाजपला २२ जागांवर समाधान मानावे लागले आणि भाजपचे सत्तास्वप्न भंगले.

शासकीय महिला तंत्रनिकेतन येथे सकाळी १० वाजता मतमोजणीला सुरुवात झाली. सुरुवातीच्या काही फेऱ्यांमध्ये चुरस दिसून आली. मात्र, पुढील फेऱ्यांमध्ये काँग्रेस-वंचित आघाडीने सातत्याने आघाडी घेतली आणि अखेर ४७ जागांवर विजय निश्चित केला. काँग्रेसचे नेते अमित देशमुख यांची या विजयामध्ये निर्णायक भूमिका बजावली. भाजपचे प्रदेशाध्यक्ष रवींद्र चव्हाण केलेल्या चुकीच्या वक्तव्यामुळे काँग्रेसचा कार्यकर्ता पेटून उठला. या निवडणुकीत लिंगायत मतदान पूर्णतः काँग्रेसच्या बाजूने वळले. शिवाय वंचित आघाडीबरोबर युती केल्याने दलित, मुस्लिम आणि लिंगायत अशी मतपेढी निर्माण झाली. त्यामुळे काँग्रेसचा विजय झाल्याचे मानले जात आहे.

प्रचारादरम्यान पालकमंत्री संभाजी पाटील निलंगेकर, आमदार अभिमन्यू पवार, आमदार रमेश कराड, माजी मंत्री बसवराज पाटील मुरुमकर, तसेच राष्ट्रवादीचे बाबासाहेब पाटील, संजय बनसोडे, शिक्षक आमदार विक्रम काळे आदी नेत्यांनी अमित देशमुख यांच्यावर जोरदार टीका केली होती. मात्र, त्यांना कोणतेही प्रत्युत्तर अमित देशमुख यांनी दिले नाही. विजयानंतर अमित देशमुख म्हणाले, ' लातूर हे विलासराव देशमुख यांचे शहर आहे.

महापालिकेत पक्षनिहाय बलाबल असे

- काँग्रेस वंचित आघाडी : ४७ (यात चार वंचित)
- भाजप : २२
- राष्ट्रवादी अजित पवार : १

लातूरकर आपल्या अस्मितेवर आणि ओळखीवर प्रश्न उपस्थित करणाऱ्यांना मतदानातून उत्तर देतात.' त्यामुळे लातूरमध्ये हातच भारी ठरला. शिवसेना आणि राष्ट्रवादी काँग्रेसला खातेही उघडता आले नाही.

राष्ट्रवादी (अजित पवार गट) चा अपयशी प्रारंभ

लातूरमध्ये पहिल्यांदाच स्वतंत्र ताकदीने लढणाऱ्या राष्ट्रवादी काँग्रेस (अजित पवार गट) ला अपेक्षित यश मिळाले नाही. केवळ एका जागेवर त्यांना विजय मिळवता आला. पूर्व भागात एमआयएम उमेदवारांना मिळालेल्या मतांमुळेही राष्ट्रवादीला नुकसान झाल्याचे चित्र आहे.

हिंगोली पालिकेत शिवसेनेचा वरचष्मा

उपनगराध्यक्षपदासह स्वीकृत सदस्यांवरही सत्ता मजबूत

लोकसत्ता वार्ताहर

हिंगोली : नगर पालिकेच्या पहिल्याच सर्वसाधारण सभेत शिवसेनेने आपली राजकीय ताकद ठळकपणे दाखवून दिली. उपनगराध्यक्षपदावर शिवसेनेचे माबूद बागवान यांची बिनविरोध निवड होताच, स्वीकृत सदस्यपदांवरही शिवसेनेने बहुमत राखत पालिकेतील सत्ता अधिक भक्कम केली आहे. या घडामोडींमुळे स्थानिक राजकारणात शिवसेनेने विरोधकांसमोर नवे राजकीय आव्हान उभे केले आहे.

हिंगोली नगरपालिकेच्या सभागृहात शुक्रवारी नगराध्यक्षा रेखा श्रीराम बांगर यांच्या अध्यक्षतेखाली पहिली सर्वसाधारण सभा पार पडली. या सभेत उपनगराध्यक्षपदासाठी शिवसेनेचे माबूद बागवान यांचा एकमेव अर्ज दाखल झाल्याने त्यांची बिनविरोध निवड जाहीर करण्यात आली. या निवडीने पालिकेतील सत्ताकारणात शिवसेनेचा दबदबा स्पष्ट झाला.

सभेला शिवसेनेचे १६, राष्ट्रवादी काँग्रेसचे १०, काँग्रेसचे दोन तर भाजपाचे पाच नगरसेवक उपस्थित होते. यावेळी मुख्याधिकारी अरविंद मुंडे यांचीही उपस्थिती होती. याच सभेत स्वीकृत सदस्यपदासाठी शिवसेनेचे गुड्डू बांगर व नितीन बांगर, राष्ट्रवादीचे शेख शकील आणि भाजपाचे कैलास शहाणे यांची निवड जाहीर करण्यात आली.या निर्णयानंतर शिवसेनेच्या पदाधिकारी व कार्यकर्त्यांनी एकच जल्लोष करत माबूद बागवान, गुड्डू बांगर व नितीन बांगर यांचा सत्कार केला. राष्ट्रवादीकडून शेख शकील तर भाजपाकडून कैलास शहाणे यांचा सत्कार करण्यात आला.

मतदान केंद्रावर तणाव

छत्रपती संभाजीनगर : छत्रपती संभाजीनगर महानगरपालिकेच्या निवडणुकीची मतमोजणी सुरू होण्यापूर्वी आणि उमेदवारांना विजयी घोषित केल्यावरून दोन वेगवेगळ्या ठिकाणी मोठा जमाव जमून तणावाची परिस्थिती शुक्रवारी सकाळी व सायंकाळी निर्माण झाली होती. सकाळी शासकीय तंत्रनिकेतनमध्ये उमेदवारांच्या प्रतिनिधींना सोडण्यावरून काही कार्यकर्ते व पोलिसांमध्ये शाब्दिक चकमक उडाली. यावरून पोलिसांना लाठीमार करावा लागला. या लाठीमारामध्ये शिवसेनेचे (शिंदे) नेते, माजी महापौर विकास जैन जखमी झाले. काही कार्यकर्त्यांना चोप दिल्यावरून पालकमंत्री संजय शिरसाट, हर्षदा शिरसाट यांनी जखमींची भेट घेतली.

नांदेड मनपामध्ये भाजपचे 'अशोक पर्व !'

लोकसत्ता वार्ताहर

नांदेड : नांदेड नगर परिषद ते नांदेड-वाघाळा महानगरपालिका या प्रवासाच्या अमृतमहोत्सवी पर्वाकडे वाटचाल करणाऱ्या शहराच्या या मध्यवर्ती संस्थेमध्ये खासदार अशोक चव्हाण यांनी आपल्या पूर्वीच्या काँग्रेस पक्षाला हद्दपार करत भाजपचे कमळ फुलविण्याची अवघड मोहीम शुक्रवारी फत्ते केल्यानंतर शहर आणि जिल्हाभर या विजयाचा आनंदोत्सव भाजपने साजरा केला.

या मनपाच्या २० प्रभागांतील ८१ जागांपैकी भाजपने ६६ जागा लढविल्या होत्या. त्यांपैकी ४५ जागा जिंकून या पक्षाने ऐतिहासिक शहरामध्ये संस्मरणीय विजयाची नोंद केली. गेल्या निवडणुकीत मनपातून हद्दपार झालेल्या 'एमआयएम'ने दमदार पुनरागमन करत २४ वर्षे सत्ता गाजविणाऱ्या नेतृत्वहीन काँग्रेसला तिसऱ्या स्थानावर फेकले आहे, तर दोन आमदार असूनही शिवसेनेची, तसेच प्रचारादरम्यान नांदेडचा कारभारी बदलण्याचा नारा देणाऱ्या राष्ट्रवादी काँग्रेसची या निवडणुकीमध्ये धूळधाण उडाली आहे.

तिसाव्या वर्षाकडे वाटचाल करणाऱ्या मनपामध्ये भाजपचा महापौर होणार ही बाब आनंददायी असून, मी केलेल्या आवाहनाला नांदेडकरांनी चांगला प्रतिसाद दिला, अशी प्रतिक्रिया खासदार अशोक चव्हाण यांनी विजयानंतर आवर्जून दिली.

नांदेड उत्तर आणि दक्षिण या दोन विधानसभा मतदारसंघांमध्ये विभागलेल्या मनपाच्या २० पैकी ९ प्रभागांतील चारही जागा जिंकून भाजपने या निवडणुकीत लक्षवेधी कामगिरी बजावली. काँग्रेस-वंचित आघाडीला अशी कामगिरी तीन प्रभागांमध्ये करता आली. हे वृत्त लिहीत असेपर्यंत काँग्रेस-वंचित आघाडीने मिळून १५ जागा जिंकल्या असल्याचे सांगण्यात आले.

मनपा निवडणुकीच्या मतमोजणीसाठी अधिकारी आणि कर्मचारी मिळून पाचशे जणांची नियुक्ती करण्यात आली होती. परंतु मतमोजणीची प्रक्रिया अत्यंत संथगतीने चालल्यामुळे सर्व निकाल येण्यास सायंकाळ उलटून गेली होती. सर्व जागांचे निकाल जाहीर होण्यापूर्वीच भाजपच्या शेकडो कार्यकर्त्यांनी विजयाचा गुलाल उधळत शहरभर आनंदोत्सव साजरा केला, तर दुसरीकडे काँग्रेस-शिवसेना-राष्ट्रवादी काँग्रेस या पक्षांच्या कार्यकर्त्यांत सुतकी अवकळा पसरली होती.

छत्रपती संभाजीनगरमधून रशीद मामू विजयी

लोकसत्ता विशेष प्रतिनिधी

छत्रपती संभाजीनगर : ज्या नावाभोवती छत्रपती संभाजीनगरची निवडणूक प्रचाराच्या पहिल्या टप्प्यात फिरली ते रशीद मामू यांनी उद्धव ठाकरे पक्षाची मशाल पेटती ठेवली. ते पडेगाव भागातून १ हजार ३०० हून अधिक मतांनी निवडून आले आहेत. या भागात मुस्लिम मतदारांची लक्षणीय संख्या आहे. उद्धव ठाकरे यांचा पक्ष मुस्लीम धार्जिणा आहे, याचे दर्शक म्हणून प्रचारात भाजपने रशीद मामू यांचा उल्लेख वारंवार केला होता. भाजपच्या एकमेव मोठ्या सभेतही नितेश राणे यांनी रशीद मामू यांचा उल्लेख केला. त्यांचे सध्याचे वय ८४ वर्षे एवढे आहे. या विजयाचे वर्णन मामू आले शिवसेना गेली असे केले जात आहे.

रशीद मामू यांना शिवसेनेच्या ठाकरे गटात प्रवेश देण्यावरून विरोधी पक्ष नेते अंबादास दानवे आणि चंद्रकांत खैरे यांच्यामध्ये कमालीचे मतभेद झाले होते. चंद्रकांत खैरे यांनी समान नागरी कायद्यासाठी शिवसेनेकडून काढण्यात आलेल्या मोर्चावर रशीद मामू यांना दगडफेक करायला लावली होती. त्यांना शिवसेनेत समावून घेणे चुकीचे असल्याचे जाहीरपणे सांगितल्याने सेनेतील वाद चव्हाट्यावर आले. पुढे शिवसेनेत प्रवेश दिल्यानंतर रशीद मामू यांना मशाल चिन्हावर पडेगाव भागातून उमेदवारी देण्यात आली. या भागातून ते निवडून आल्याने शिवसेनेच्या ठाकरे गटाला एका जागेची भर पडली. मात्र, त्यांच्यामुळे शहरातील अन्य मुस्लिम मतदार शिवसेनेकडे वळेल, हा सेना नेत्यांचा होरा चुकला.

शिवसेना आटली, शिवसेना घटली !

लोकसत्ता विशेष प्रतिनिधी

छत्रपती संभाजीनगर : 'आवाज कुणाचा' असं म्हटल्यावर हजारोंच्या संख्येने येणारा 'शिवसेना' हा आवाज फुटीनंतर क्षीण होत गेला. महापालिकेच्या निवडणुकीनंतर शिवसेनेचे धनुष्यबाणाचे १३ उमेदवार निवडून आले. पूर्वी सत्तेत ३१ नगरसेवक असणाऱ्या शिवसेनेला सात जागांवर रोखण्यात भाजपला यश आले. राज्यात सत्तेत मित्र पक्ष असणाऱ्या शिवसेनेची कोंडी तर झालीच शिवाय उद्धव ठाकरे यांना दोन अंकी संख्याही गाठता आली नाही.

सात माजी महापौरांनी उद्धव ठाकरे गटातून शिवसेनेच्या शिंदे गटात प्रवेश केला होता. यामध्ये नंदकुमार घोडले, विकास जैन, अनिता घोडले, त्र्यंबक तुपे, कला ओझा, विमल राजपूत, किशनचंद तनावणी या सात जणांपैकी कला ओझा आणि विमल राजपूत यांना उमेदवारी मिळाली नव्हती. विकास जैन यांनी त्यांचा मतदारसंघ हर्षदा शिरसाट यांच्यासाठी मोकळा करून दिला. ते त्यांचे उमेदवार प्रतिनिधी होते. यामुळे तेही या निवडणुकीमध्ये उमेदवार नव्हते. नंदकुमार घोडले यांच्या पत्नी अनिता घोडले वगळता कोणालाही प्रभाव राखता आला नाही. शिवसेना नेते संजय शिरसाट यांचा वादग्रस्त मुलगा सिद्धांत शिरसाट आणि मुलगी हर्षदा या मात्र निवडून आल्या. शिवसेनेला रोखण्यात भाजपच्या नेत्यांना यश आले.

शिवसेनेची मागील निवडणुकीतून थेट चौदावर घसरण झाली. जमीन घोटाळ्यात पालकमंत्री संजय शिरसाट यांनी डागाळलेली प्रतिमा, खासदार संदपान भुमरे यांच्या दारू दुकानाचा प्रचार याचाही शहरी मतदारांवर प्रभाव होता. तसेच पिण्याच्या पाण्याच्या योजनेत केलेल्या अनागोंदीची शिक्षाही मतदारांनी दोन्ही शिवसेनेला दिली. शिवसेना एकनाथ शिंदे गटाचे जिल्हा प्रमुख राजेंद्र जंजाळ निवडून आले.

शिवसेनेच्या उद्धव ठाकरे गटात नेत्यांमध्ये जाहीर वाद अगदी रोजच्या रोज दिसून येत असे. रशीदमामू यांच्या पक्षात घेण्यावरून भाजपने ठाकरे गटाला मुस्लिम धार्जिणे ठरवले. परिणामी उद्धव ठाकरे गटाला शहरात केवळ सात जागांपर्यंतच जाता आले. ठाकरे गटाची धुळधाण झाली. ती शिवसेना जणू आटलीच, असे चित्र निर्माण झाले आहे.

परभणी महापालिकेत काँग्रेसच्या मदतीने ठाकरे गटाकडे सत्तासूत्रे

परभणी : महापालिका निवडणुकीत सर्वत्र सत्ताधारी पक्षांचा बोलबाला दिसत असताना येथे मात्र उद्धव बाळासाहेब ठाकरे यांच्या शिवसेनेची मशाल पेटली आहे. काँग्रेसच्या मदतीने शिवसेना (ठाकरे) निर्विवाद बहुमतापर्यंत जाऊन पोहोचली असून भारतीय जनता पक्षाला केवळ बारा जागांवर समाधान मानावे लागले आहे.

अजित पवारांच्या राष्ट्रवादी काँग्रेसला १० जागा मिळाल्या असून जनसुराज्य पक्षाला ४, यशवंत सेना १, अपक्ष १ असे महापालिकेतील पक्षीय बलाबल आहे. तब्बल २५ जागा मिळवून उबाठा शिवसेना हा क्रमांक एकचा पक्ष ठरला असून अजूनही परभणी हा उद्धव ठाकरे यांच्याच शिवसेनेचा बालेकिल्ला असल्याचे सिद्ध झाले आहे. काँग्रेस पक्षासोबत उबाठाची निवडणूकपूर्व आघाडी झाल्याने आणि काँग्रेसला १२ जागा मिळाल्याने या दोन्ही पक्षांच्या सत्ता स्थापनेचा मार्ग मोकळा झाला आहे.

गेल्या महापालिका निवडणुकीत काँग्रेस पक्षाने माजीमंत्री सुरेश वरपुडकर यांच्या नेतृत्वाखाली जोरदार आघाडी मिळवली होती. यावेळी वरपूडकरांनी भारतीय जनता पक्षात प्रवेश केला तरीही त्यांच्या या प्रवेशाचा भाजपला कोणताही फायदा झाला नाही. खासदार संजय जाधव, आमदार राहुल पाटील हे उद्धव बाळासाहेब ठाकरे शिवसेनेचे दोन मातब्बर स्थानिक नेते सेनेशी एकनिष्ठ राहिले. लोकसभा विधानसभेपाठोपाठ महापालिकेवरही या पक्षाने आपले वर्चस्व सिद्ध केले.

जालन्यात भाजपचे सत्तास्वप्न साकार

लोकसत्ता वार्ताहर

जालना : जालना महानगरपालिकेवर स्वतःची सत्ता स्थापन करण्याचे भाजपचे स्वप्न अखेर पूर्ण झाले. ६५ पैकी ४१ जागा जिंकून भाजपने या महानगरपालिकेत स्वबळावर सत्ता काबीज केली आहे.

जालना महानगरपालिकेची ही पहिलीच निवडणूक आहे. यापूर्वी नगरपरिषद अस्तित्वात असताना १९९१-१९९२ पासून शिवसेना आणि भाजपने सर्व निवडणुका एकत्रित युती म्हणून लढविल्या होत्या. परंतु, एकदाही भाजपचा नगराध्यक्ष होऊ शकला नव्हता. कायम शिवसेनेच्या अधिक जागा निवडून येत गेल्यामुळे भाजपला नेहमीच उपाध्यक्षपदावर समाधान मानावे लागले होते.

महानगरपालिका अस्तित्वात आल्यावर भाजप आणि शिवसेनेने ही निवडणूक स्वबळावर लढविली. त्यामध्ये भाजपला ४१ तर शिवसेनेला १२ जागा मिळाल्या. काँग्रेसला ९ तर एमआयएम पक्षाला दोन जागा मिळाल्या. एका अपक्ष उमेदवाराचा विजय झाला.

भाजपचे नेते रावसाहेब दानवे यांचे बंधू भास्कर दानवे आणि त्यांच्या पत्नी सुशीला दानवे, माजी आमदार कैलास गोरंट्याल यांच्या पत्नी संगीता आणि पुत्र अक्षय गोरंट्याल त्याचप्रमाणे शिवसेनेचे (शिंदे) आमदार अर्जुन खोतकर यांच्या कन्या दर्शना झोल यांचा विजयी झालेल्या उमेदवारांमध्ये समावेश आहे.

निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर काँग्रेसचे माजी आमदार कैलास गोरंट्याल यांनी भाजपमध्ये प्रवेश केला होता. रावसाहेब आणि भास्कर दानवे तसेच गोरंट्याल यांनी या निवडणुकीत पक्षाच्या विजयासाठी प्रयत्न केले. महापालिका निवडणुकीच्या निमित्ताने साडेतीन दशकांनंतर भाजपला जालना शहराच्या स्थानिक स्वराज्य संस्थेत यश मिळाले.

pnb Housing Finance Limited Ghar Ki Baat

परिशिष्ट-IV-ए - ई-लिलाव - स्थावर मालमत्तेची जाहीर विक्रि सूचना

सिक्युरिटी इंटरेस्ट (एन्फोर्समेंट) रुल्स, २००२ च्या रुल ८(६) च्या तरतुदीसह वाचलेल्या सिक्युरिटायझेशन अँड रिकन्स्ट्रक्शन ऑफ फायनान्शियल ॲसेट्स अँड एन्फोर्समेंट ऑफ सिक्युरिटी इंटरेस्ट ॲक्ट, २००२ अंतर्गत स्थावर मत्तेच्या विक्रिकरिता ई-लिलाव-विक्रि सूचना

नोंदणीकृत कार्यालय : ९वा मजला, अंत्रिक्ष भवन, २२ कस्तुर्बा गांधी मार्ग, नवी दिल्ली-११०००१, फोन्स : ०११-२३३५७१७१, २३३५७१७२, २३७०५४१४, वेबसाइट : www.pnbhousing.com

औरंगाबाद शाखा कार्यालय : ई-१, ई-२ व ई-३, चौथा मजला, औरंगाबाद बिझनेस सेंटर, अदालत रोड, औरंगाबाद-४३१००१, महाराष्ट्र.

याद्वारा आम जनतेस आणि विशेषकरून रकाना नं. "ए" मध्ये दर्शविलेल्या ऋणको व हमीदारांना सूचना देण्यात येते की, सुरक्षित धनकोकडे गहाण असलेल्या / ताब्यात असलेल्या याखालील रकाना नं. "डी" मध्ये वर्णिलेल्या स्थावर मालमत्तेचा विधायक / प्रत्यक्ष ताबा (रकाना नं. "सी"मध्ये वर्णिल्यानुसार) "मेसर्स पीएनबी हाऊसिंग फायनान्स लिमिटेड" / सुरक्षित धनकोच्या प्राधिकृत अधिकारींद्वारा घेण्यात आला आहे, सदर स्थावर मालमत्तेची विक्रि याखाली दिलेल्या तपशीलानुसार "जसे आहे जेथे आहे", "जसे आहे जे काही आहे" आणि "जे काही आहे तेथे आहे" या तत्वावर करण्यात येणार आहे. ऋणको / गहाणकार / विधि वारसदार, विधि प्रतिनिधी (जे ज्ञात आहेत किंवा ज्ञात नाहीत), तारखेनुसार सुधारित केल्याप्रमाणे सिक्युरिटी इंटरेस्ट एन्फोर्समेंट रुल्स, २००२ च्या रुल ८(६) व ९ अंतर्गत रकाना नं. "ए" मध्ये दर्शविल्यानुसार, जसे असेल त्यानुसार, संबंधित ऋणको / गहाणकारांचे (दिवंगत असल्यामुळे) निष्पादक, प्रशासक, उत्तराधिकारी, अभिहस्तांकिती यांना याद्वारा सूचना देण्यात आली आहे. विक्रिच्या सविस्तर शर्ती व अटींकरिता कृपया "मेसर्स पीएनबी हाऊसिंग फायनान्स लिमिटेड" / सुरक्षित धनकोच्या www.pnbhousing.com या वेबसाइटवर तरतूद केलेली लिंक पाहावी.

लोन नं. / ऋणको / सह-ऋणको / हमीदार / विधि वारसदाराचे नाव (ए)	मागणी केलेली रक्कम व तारीख (बी)	ताब्याचे स्वरूप (सी)	गहाण असलेल्या मालमत्तेचे वर्णन (डी)	राखीव किंमत (आरपी) (ई)	इरठे (आरपीची १०%) (एफ)	बोलीच्या सादरीकरणाची शेवटची तारीख (जी)	बोली वृद्धी दर (एच)	पाहणीची तारीख व वेळ (आय)	लिलावाची तारीख व वेळ (जे)	ज्ञात भार / न्यायालयीन प्रकरण, जर असल्यास (के)
HOU/ARNG/0122/944355, प्रल्हाद मोरे / प्रिती प्रल्हाद मोरे शाखा कार्यालय : औरंगाबाद	रु. ३२,६२,९४३.३१ व ०७.०५.२०२५	प्रत्यक्ष ताबा	रो हाऊस नं. ०८, गट नं. ३०३ / ३ / पार्ट, हिरा पार्क, हर्सूल, औरंगाबाद-४३१००१, महाराष्ट्र, भारत.	रु. ३०,६२,०००	रु. ३,०६,२००	१३.०२.२०२६	रु. १०,०००/-	०३.०२.२०२६ रोजी दु. १२:०० व दु.०४:०० दरम्यान	१६.०२.२०२६ रोजी दु.०२.०० व दु. ०३:०० दरम्यान	ज्ञात नाही

* त्याकरिता वसुली आणि / किंवा प्रदानाच्या तारखेपर्यंत निघालेले लागू असल्याप्रमाणे १८% प्र.व. दराने पुढील व्याज, आनुषंगिक खर्च, किंमत, आकार, इ. सह एकत्रित. ** "पीएनबी हाऊसिंग फायनान्स लिमिटेड"च्या प्राधिकृत अधिकारींना असलेले उत्तम ज्ञान व माहितीच्या अनुसार रकाना क्र. "के" मध्ये जे काही प्रकट केले आहे ते वगळता वर नमूद केलेल्या स्थावर / सुरक्षित मत्तेवर तेथे कोणतेही भार / दावे नाहीत. याअधिक, सदर भार यशस्वी खरीददार / बोलीदाराद्वारा, त्याच्या / तिच्याकडील, सोसावयाचे आहेत / प्रदान करावयाचे आहेत. भावी खरीददार / बोलीदारांना विनंती करण्यात येते की, त्यांनी स्थावर मालमत्तेवरील नमूद केलेल्या भाराची स्वतंत्रीत्या पडताळणी करून निश्चित करावेत. (१.) आजच्या तारखेनुसार, तेथे वरील स्थावर मालमत्ता / सुरक्षित मत्तेची विक्रि करणे, अभिहस्तांतरण आणि / किंवा वासलात लावणे यापासून "पीएनबीएचएफएल"ला / "पीएनबीएचएफएल"च्या प्राधिकृत अधिकारींना प्रतिबंध करण्यास कोणताही आदेश आणि / किंवा निषेधाज्ञा आलेली नाही आणि / किंवा वरील स्थावर मालमत्ता / सुरक्षित मत्तेची वासलात आणि दर्जा रकाना क्र. "के" मध्ये नमूद करण्यात आले आहे. (२.) भावी खरीददार / बोलीदार आणि स्वारस्य असलेले पक्षकार रकाना नं. "के" मध्ये नमूद केलेली व मंजूर केलेली प्रक्रिया / आदेश, इ., जर असल्यास, त्यामधील याचिकांबाबत तपासणी स्वतः स्वतंत्रपणे करू शकतील. समाविष्ट परंतु त्याकरिता "पीएनबीएचएफएल"कडे उपलब्ध असलेल्या संबंधित नामाधिकाराच्या कागदपत्रांचे नामाधिकार मर्यादित नाहीत आणि निविदा / बोली अर्ज प्रपत्र किंवा प्रस्ताव सादर करण्यापूर्वी सर्व बाबतीत स्वतःचे समाधान करून घ्यावे. बोलीदाराने बोली प्रपत्रासमवेत या लिलावाच्या शर्ती व अटी स्वाक्षरीकृत करून घ्यावयाच्या आहेत. (३.) कृपया नोंद घ्यावी की, सिक्युरिटी इंटरेस्ट (एन्फोर्समेंट) रुल्स, २००२च्या रुल ९(३)च्या अनुसार, बोलीदार / खरीददाराने त्याच दिवशी किंवा उशिरात उशिरा कामाच्या पुढील दिवशी विक्रि किंमतीच्या (इसारा रक्कम समाविष्ट, जर भरलेली असल्यास) २५% ठेव, कायदेशीररीत्या बांधील असलेली, भरावयाची आहे. विक्रि सिक्युरिटी इंटरेस्ट (एन्फोर्समेंट) रुल्स, २००२च्या रुल ९(२) च्या अनुसार सुरक्षित धनकोद्वारा विक्रि किंमतीच्या २५% रकमेच्या स्वीकृतीनंतरच केवळ बोलीदाराच्या नावे निश्चित करण्यात येईल. विक्री विचाराधीन उर्वरित रकमेच्या ७५% विक्रि निश्चितीकरण पत्राच्या अभिस्वीकृतीच्या तारखेपासून १५ दिवसांच्या आत खरीददाराद्वारा भरावयाची आहे आणि सदर ठेव भरण्यात कसूर झाल्यास, प्राधिकृत अधिकारी विक्रि निश्चितीकरण पत्रात नमूद केलेल्या १५ दिवसांचा अनिवार्य कालावधी संपण्याच्या तारखेपासून १५ दिवसांच्या आत विक्रि निश्चितीकरण रकमेचा भागशः प्रदान जप्त करतील आणि मालमत्ता / सुरक्षित मत्ता सरफेसी ॲक्टच्या तरतुदींच्या अनुसार पुन्हा विक्रिकरिता ठेवण्यात येईल. (४.) सी१ इंडिया प्रायव्हेट लिमिटेड ई-लिलावाद्वारा विक्रिच्या आयोजनात प्राधिकृत अधिकारीस सहाय्य करणार आहे. तिचे कॉर्पोरेट कार्यालय येथे असलेले - प्लॉट नं. ६८, तिसरा मजला, सेक्टर ४४, गुरगाव, हरयाणा-१२२००३ वेबसाइट - www.bankeauctions.com बोली कागदपत्रे प्राप्त करणे किंवा मालमत्तेच्या पाहाणीसंबंधित कोणत्याही सहाय्याकरिता आणि कोणत्याही अन्य शंकांकरिता किंवा नोंदणीकरिता गणेश अंकुश / निलाक्षी पाटील - टोल-फ्रि नं. : १८०० १२० ८८००, ई-मेल : auction@pnbhousing.com, जी "पीएनबीएचएफएल"ची अधिकृत व्यक्ती आहे, यांच्याशी समन्वय साधावयाचा आहे किंवा www.pnbhousing.com या वेबसाइटला भेट द्यावी.

स्थळ : औरंगाबाद दिनांक : १६.०१.२०२६ — स्वाक्षरी/- प्राधिकृत अधिकारी, पीएनबी हाऊसिंग फायनान्स लिमिटेड

जागाविषयक

पुणे, परांजपे स्कीम, भूगाव, नवा कोरा 2 BHK एरिया ९७५, हायर फ्लोअर, लिफ्ट, पार्किंगसह विकणे आहे. मालकाशी संपर्क : 9657081100.

0071012648-1

महत्त्वपूर्ण निवेदन

वृत्तपत्रामध्ये प्रसिद्ध होणाऱ्या जाहिरातींचा मजकूर (ॲडव्हर्टाईझिंग कॉपी) स्वीकारण्यापूर्वी काळजी घेतली जात असली तरी त्याच्या आशयाची (कंटेन्ट) पडताळणी करणे शक्य होत नाही. तरी, आपल्या वृत्तपत्रामध्ये अथवा प्रकाशनांमध्ये प्रसिद्ध होणाऱ्या जाहिरातीतील जाहिरातदार कंपन्या, सहयोगी संस्था अथवा व्यक्तींबरोबर व्यवहार केल्यामुळे कोणत्याही स्वरूपाचे नुकसान वा हानी झाल्यास त्यासाठी अथवा संबंधित जाहिरातीतील आशयासाठी द इंडियन एक्स्प्रेस (प्रा.) लिमिटेडला जबाबदार ठरविता येणार नाही. त्यामुळे वाचकांना आम्ही असा सल्ला देतो की, जाहिरातदारांना कोणतीही रक्कम प्रेषित करण्यापूर्वी अथवा त्यांच्याबरोबर कोणताही स्वरूपाचा संमतिपत्र कार्यसिद्ध करण्यापूर्वी अथवा एखाद्या जाहिरातीवर आधारित कोणतीही कृती करण्यापूर्वी त्यांनी आवश्यक ती चौकशी करण्याची खबरदारी घ्यावी.

इनटेक कॅपिटल लिमिटेड

७०८, मंजुषा बिल्डिंग, ५७ नेहरू प्लेस, नवी दिल्ली-११००१९

ई-लिलाव विक्री सूचना

[सिक्युरिटी इंटरेस्ट एन्फोर्समेंट नियमावली, २००२ च्या नियम ९(१) अंतर्गत]

सिक्युरिटायजेशन ॲण्ड रिकन्स्ट्रक्शन ऑफ फायनान्शियल ॲसेट्स ॲण्ड एन्फोर्समेंट ऑफ सिक्युरिटी इंटरेस्ट ॲक्ट, २००२ (सरफेसी कायदा २००२) अंतर्गत स्थावर मालमत्तेच्या विक्रीसाठी ई-लिलाव विक्री सूचना.

सूचना याद्वारे सामान्य जनतेला आणि विशेषतः कर्जदार, सह-कर्जदार आणि हमीदारांना प्राधिकृत अधिकाऱ्याद्वारे देण्यात येत आहे की, खाली नमूद केलेली मालमत्ता इन्टेक कॅपिटल लिमिटेडकडे गहाण ठेवलेली आहे. कंपनीच्या अधिकृत अधिकाऱ्याने सिक्युरिटायजेशन ॲण्ड रिकन्स्ट्रक्शन ऑफ फायनान्शियल ॲसेट्स ॲण्ड एन्फोर्समेंट ऑफ सिक्युरिटी इंटरेस्ट ॲक्ट, २००२ च्या तरतुदीनुसार मालमत्तेचा ताबा घेतला आहे. खालील तपशिलानुसार, खाली नमूद केलेली थकबाकी आणि त्यावरील पुढील व्याज, शुल्क आणि खर्च इत्यादींच्या वसुलीसाठी मालमत्ता निविदा-सह सार्वजनिक ई-लिलावाद्वारे विक्री करण्यात येईल :

नमूद मालमत्ता **'जशी आहे तेथे आहे', 'जशी आहे तशी आहे' आणि 'जेथे आहे तेथे आहे'** या तत्त्वावर, **०४.११.२०१७** अनुसार **रु. १२,३९,४३,६८९/- (रुपये बारा कोटी एकोणचाळीस लक्ष त्रेचाळीस हजार सहाशे एकोणनव्वद मात्र)** आणि जोपर्यंत भरणा/वसुली होत नाही, तोपर्यंत त्यावरील पुढील व्याजाच्या वसुलीसाठी विकली जाईल याची कृपया नोंद घ्यावी.

अ. क्र.	कर्जदार आणि हमीदाराचे नाव	गहाण मालमत्तेचा तपशील	१. राखीव मूल्य २. इसारा रक्कम ठेव (इरठे) ३. बोली वाढ रक्कम	ताब्याचा प्रकार
१.	मे. एजीस एम्पोलस ॲण्ड विलाज लि., आयुब गफार सयेद, आयेशा आयुब सयेद, प्रमोद भानदास गुजर, एजिस फोर्जिंग लि.	प्लॉट क्र. के-४ आणि के-५, एमआयडीसी वाळूंज, रांजणगाव शेमपुंजी, जिल्हा औरंगाबाद, महाराष्ट्र.	१) १०,९९,५४,७६०/- २) १,००,९५,४७६/- ३) ५०,०००/-	सांकेतिक

पाहणीचा दिनांक आणि वेळ : सर्व मालमत्तांची पाहणी **१९.०१.२०२६ ते २४.०१.२०२६ दरम्यान स. ११.०० वा. ते सायं. ४.०० वा.** पर्यंत करता येईल. अशोक कुमार यांच्याशी ७२९०९५४९६४ वर स. ११:०० वा. ते सायं. ६:०० वा. दरम्यान संपर्क करता येईल.

इरठे सादर करण्यासाठी दिनांक आणि वेळ ०२.०२.२०२६ रोजी सायं. ५.०० वा. पर्यंत किंवा त्यापूर्वी आहे आणि सोबत सहभागी होण्यासाठी विनंती पत्र, केव्हायसी, पॅन कार्ड, इरठेचा पुरावा dinesh.negi@inteccapital.com nodalofficer.north@inteccapital.com वर पाठवावे. संपर्क क्र.: ०११-४६५२२३१५.

ई-लिलावाचा दिनांक आणि वेळ : ०३.०२.२०२६ रोजी दुपारी १२.०० वा. ते दुपारी २.०० वा.

इच्छुक खरेदीदार/ बोली लावणाऱ्यांनी इरठे रक्कम केवळ इन्टेक कॅपिटल लिमिटेडच्या नावाने डिमांड ड्राफ्टद्वारे जमा करणे आवश्यक आहे.

ई-लिलावाच्या अटी आणि शर्ती

१. वरील तक्त्यामध्ये नमूद केलेल्या तारखांना, ५ मिनिटांच्या अमर्यादित मुदतवाढीसह, मिथिलेश कुमार-७०८०८०४४६६, mithalesh.kumar@c1india.com आणि delhi@c1india.com यांच्याशी त्यांच्या https://www.bankeauctions.com या वेबसाइटवर संपर्क साधा. बोली लावण्यापूर्वी, बोली लावणाऱ्यांनी लिलाव विक्रीच्या सविस्तर अटी व शर्ती तपासण्याचा सल्ला दिला जातो, त्यासाठी https://www.bankeauctions.com या लिंकचा संदर्भ घ्या.
२. इच्छुक बोली लावणाऱ्यांनी पोर्टलवर स्वतःची नोंदणी करणे आणि आगाऊ लॉग-इन आयडी व पासवर्ड मिळवणे आवश्यक आहे, जे ई-बोलीसाठी अनिवार्य आहे. लिलाव सेवा प्रदात्याकडून (C1 INDIA) संभाव्य बोलीदार त्यांच्या नोंदणीकृत मोबाइल क्रमांकावरूनच ई-लिलावाचे ऑनलाइन प्रशिक्षण घेऊ शकतात.
३. लिलाव प्रक्रियेत ऑनलाइन ई-लिलावात सहभाग घेणे अनिवार्य आहे, त्यासाठी विहित नमुन्यात अर्ज करावा लागेल, जो वेबसाइटवर ऑफर/निविदा दस्तऐवजासोबत उपलब्ध आहे.

दिनांक : १६.०१.२०२६
ठिकाण : दिल्ली

सही/- प्राधिकृत अधिकारी, इनटेक कॅपिटल लिमिटेड